देशोन्नती मंगळवार, दि.२० सप्टेंबर २०१६

# शहरात केवळ ३४८ बेघर व्यक्ती!

## तीन महाविद्यालयांचे सर्वेक्षण



प्रतिनिधी/ १९ सप्टेंबर

नागपूरः समाज कल्याण विभाग दिनदयाल अन्त्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत अंतर्भूत बेघर लोकांसाठी निवारा याउपांतर्गत सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात प्राप्त माहितीनुसार एकूण ३४८ व्यक्ती बेघर असल्याचे आढळून आले आहे. पंचेवीस लाखांच्या वर लोकसंख्या असलेल्या शहरात केवळ ३४८ बेघर व्यक्तींची संख्या कुठल्या आधारे घेण्यात आली आहे. याबाबत चर्चेला उधाण आले आहे. हे सर्वेक्षणच अपुरे असल्याचे बोलले जात आहे.

समाजकार्य महाविद्यालयांच्या ३१ विद्यार्थ्यांनी हे सर्वेक्षण केले आहे. मध्य रेल्वेस्थानक परिसर, गणेश मंदिर टेकडी परिसर, गांधीबाग मार्केट परिसर, मोमीनपुरा परिसर, इतवारी मार्केट व रेल्वे स्टेशन, मोठा ताजबाग परिसर, सक्करदरा व मेडिकल परिसर, लहान ताजबाग परिसर, कमाल टॉकीज चौक ते जरीपटका मार्केट परिसर, कॉटन मार्केट परिसर, गोकुळपेठ व रामनगर मार्केट, तेलंखेडी हनुमान मंदिर परिसर, मिठा निम दर्गा परिसर, सदर मार्केट परिसर ते मानकापूर परिसरात विद्यार्थ्यांनी सर्वेक्षण केले आहे.

या सर्वेक्षणात मनपा उपायुक्त रंजना लाडे यांच्या मार्गदर्शनाखाली समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले. सर्वेक्षणात तिरपुडे कॉलेज ऑफ सोशल वर्क, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क आणि डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ सोशलवर्कचे विद्यार्थी सहभागी झाले.